महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. गृहआ-१०१७/प्र.क्र.४६९/आस्था-२
दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दि. १० नोव्हेंबर, २०१७.

<u>वाचा</u> :- १) विभागाचे कार्यालयीन आदेश, क्र.गृहआ-१०१३/प्र.क्र.१३५/आस्था-२, दि.१३.०२.२०१३.
२) शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/ मकक, दि.१९.०६.२०१४.

<u>प्रस्तावना :-</u>

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी, अशा सतावणुकीशी संबंधित तक्रारीचे / समस्यांचे निवारण करण्यासाठी, महिला व बाल विकास विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने, गृह विभाग (खुद्द) विभागातांतर्गत दि.१३.०२.२०१३ च्या आदेशान्वये महिला तक्रार निवारण समिती पुनर्गठीत केली होती. सदर समितीमधील सदस्यांची अन्य विभागात बदली झाली आहे. तसेच केंद्र शासनाने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ प्रसिध्द केला आहे. त्यानुसार महिला तक्रार निवारण समिती मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित होते.

शासन निर्णय :-

केंद्र शासनाच्या कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ मधील तरतुदी व शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, दि.१९.०६.२०१४ मधील सुचना अनुषंगाने, गृह विभाग (खुद्द) मधील महिलांच्या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी व अशा सतावणुकीशी संबंधित तक्रारीचे / समस्यांचे निवारण तसेच तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

अ.क्र.	समितीच्या सदस्यांचे नाव व पदनाम	पदनाम
१	श्रीमती श्र.सु.कवळे, अवर सचिव	अध्यक्षा
२	श्री.तु.व.महाजन, अवर सचिव	सदस्य
३	श्रीमती प्र.प्र.घाटे, कक्ष अधिकारी	सदस्य
४	श्रीमती यो.श्री.मालप, सहायक कक्ष अधिकारी	सदस्य
५	श्रीमती ज्योती पाटकर, परिवर्तन महिला संस्था, सुदाम बिल्डींग, नांदिवली रोड, प्रगती कॉलेजजवळ, डोंबिवली (पू.), जि.ठाणे	अशासकीय सदस्य
६	अवर सचिव / कक्ष अधिकारी (आस्था-२)	सदस्य सचिव

सदर समितीची कार्यकक्षा व कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील :-

(१) केंद्र शासनाच्या कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ मधील तरतुदीनुसार महिलांच्या लैंगिक छळवणूकीस आळा घालण्यासाठी व कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळावे याकरीता आवश्यक उपाययोजना करणे.

(२) सदर समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारींचे विहित कालावधीत निवारण करणे व तक्रारींच्या अनुषंगाने योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर करणे.

(३) सदर अधिनियमातील तरतुदीनुसार वार्षिक अहवाल सादर करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११०१३०८४७४२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Surendra Ambadas Deshmukh

Digitally signed by Surendra Ambadas Deshmukh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a563f0c34d0b70920aa744aa97e1366ab6e240f367d6cc635a178d00c51adc37, cn=Surendra Ambadas Deshmukh
Date: 2017.11.10 12:57:24 +05'30'

(सु.अं.देशमुख)
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) श्रीमती श्री.सु.कवळे, अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२) श्री.तु.व.महाजन, अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३) श्रीमती प्र.प्र.घाटे, कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
४) श्रीमती यो.श्री.मालप, सहायक कक्ष अधिकारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
५) श्रीमती ज्योती पाटकर, परिवर्तन महिला संस्था, सुदाम बिल्डींग, नांदिवली रोड, प्रगती कॉलेजजवळ, डोंबिवली (पू.), जि.ठाणे.

प्रत माहितीस्तव :-

१) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२) प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग,मंत्रालय, मुंबई ३२.
३) प्रधान सचिव (परिवहन व बंदरे) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
४) प्रधान सचिव (राउशु) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
५) प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
६) सर्व अधिकारी /कर्मचारी, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
७) कक्ष अधिकारी (मकक), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
८) नोंदणी शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
९) निवडनस्ती /आस्था-२.